स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११ ००१

दुरध्वनी क्रमांक- २६१२९३२१/२६१२२८४६ ई-: मेल- commpat2018@gmail.com

जा.क्र.पतसंस्था/सआ/लेप.वर्ग/निकष/सन २०२३/ ७६४ दि. ३१/०३/२०२३

## परिपत्रक

**विषय : बिगर कृषी सहकारी पतसंस्थांच्या वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीबाबत निर्धारीत केलेले गुणांकन निकषाबाबत.**

**संदर्भ :** १) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि.२९/४/२०१० व दि.२८/१२/२०११ चे परिपत्रक

२) महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचेकडील दि.१७/३/२०२२ रोजीचे परिपत्रक.

या कार्यालयाकडील परिपत्रक दि.२८/१२/२०११ चे परिपत्रकान्वये, राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी ६०० गुणांचे व पगारदार कर्मचारी पतसंस्थांसाठी २०० गुणांचे वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी निकष निर्धारित केलेले आहेत. सदरचे निकष हे या संस्थांसाठी सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात आलेले आहेत.

नागरी/ग्रामीण बिगरशेती पतसंस्थांसाठी भांडवल पर्याप्तता, जिंदगीची गुणवत्ता, व्यवस्थापन, उत्पन्न (नफा), तरलता, कार्यपद्धती व नियंत्रण या सहा घटकांना मिळालेल्या गुणांचे वेटेड ॲव्हरेज (Weighted Average) च्या आधारे वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी ठरविण्यात आलेली असून पगारदार कर्मचारी पतसंस्थांकरिता याच घटकांचे आधारे प्राप्त होणाऱ्या गुणांकानुसार वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी निकष निर्धारित करण्यात आलेले आहेत.

या कार्यालयाकडील दि.१७/३/२०२२ च्या परिपत्रकानुसार, कोविड-१९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे सहकारी पतसंस्थांच्या आर्थिक स्थितीवर, कर्ज वसुलीवर व एकंदरीत वरील नमुद सहा घटकांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विपरीत परिणाम झाल्याने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीच्या निकषांमध्ये नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी वेटेड ॲव्हरेज (Weighted Avergage) काढल्यानंतर मिळणारे गुण दहा प्रमाणे कमी व पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थासाठी १० % प्रमाणे वर्गवारीची पायरी कमी करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला होता. सदर निर्णय अपवादात्मक परिस्थितीमध्ये घेण्यात आलेला होता.

याबाबत सन २०२२-२०२३ या कालावधीकरिता वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे गुणांकन निकष आयुक्तालयाकडील दिनांक २९/०४/२०१० व दि.२८/१२/२०११ च्या परिपत्रकानुसार खालीलप्रमाणे लागू राहील .

**नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे गुणांकन निकष :-**

| अ.क्र | वेटेड ॲव्हरेज (Weighted Average) | लेखापरीक्षण वर्ग |
|---|---|---|
| १ | ७५ व त्याचेवर गुण असल्यास | अ |
| २ | ६१ ते ७४ पर्यंत गुण असल्यास | ब |
| ३ | ५१ ते ६० पर्यंत गुण असल्यास | क |
| ४ | ५० पर्यंत गुण असल्यास | ड |

**पगारदार कर्मचारी पतसंस्थांसाठी वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे गुणांकन निकष :-**

| अ.क्र | मिळालेले गुण (टक्केवारी) | लेखापरीक्षण वर्ग |
|---|---|---|
| १ | ७५ % व त्याचेवर गुण असल्यास | अ |
| २ | ६१ % ते ७४ % पर्यंत गुण असल्यास | ब |
| ३ | ५१ % ते ६० % पर्यंत गुण असल्यास | क |
| ४ | ५० % पर्यंत गुण असल्यास | ड |

राज्यातील नागरी/ग्रामीण बिगर कृषी सहकारी पतसंस्था व पगारदार सहकारी पतसंस्थांकरिता वरीलप्रमाणे वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी गुणांकन निकष हे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता लागू राहतील.

**(अनिल कवडे)**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण) (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग १, सहकारी संस्था (सर्व)
४. अध्यक्ष, नागरी/ग्रामिण / बिगर कृषी/पगारदार सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. (सर्व) (राज्य/ विभाग/ जिल्हा/ तालुका)
५. अध्यक्ष/व्यवस्थापक, ----------------- नागरी/ग्रामीण बिगरशेती/ पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.---------- ता.------- जि.-----------(सर्व)

प्रत माहितीस्तव :

१. मा.अपर मुख्य सचिव (सहकार व पणन), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ (सविनय सादर)
२. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. अपर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था/लेखापरीक्षण), मुख्यालय, पुणे
४. कार्यासन अधिकारी (माहिती व तंत्रज्ञान), मुख्यालय, पुणे - यांना संकेतस्थळावर त्वरीत प्रसिद्धीस्तव
५. धारिका संग्रही